RNI No. MAHBIL/2009/35526

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## भाग चार-क

वर्ष ८, अंक ९] गुरुवार ते बुधवार, मार्च १०-१६, २०२२/फाल्गुन १९-२५, शके १९४३ [पृष्ठे २ किंमत : रुपये ६.००

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाव्यतिरिक्त इतर वैधानिक प्राधिकाऱ्यांनी तयार केलेले (भाग एक, एक-अ व एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले वैधानिक नियम व आदेश यांव्यतिरिक्त इतर) वैधानिक नियम व आदेश ; यात भारत सरकार, उच्च न्यायालय, पोलीस आयुक्त, आयुक्त (राज्य उत्पादन शुल्क), जिल्हादंडाधिकारी व निवडणूक आयोग, निवडणूक न्यायाधिकरण, निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणूक आयोगाखालील इतर प्राधिकारी यांनी तयार केलेले वैधानिक नियम व आदेश यांचा समावेश होतो.**

**नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई यांचे कार्यालय**

रॉयल इन्शुरन्स इमारत, ५वा मजला, ज. टा. मार्ग,

चर्चगेट, मुंबई ४०० ०२०, दिनांक ०२/०४ मार्च २०२२

**वाचा**.—(१) दि केरोसीन (रेस्ट्रीक्शन ऑन युज अ‍ॅण्ड फिक्सेशन ऑफ सिलिंग प्राईस) ऑर्डर, १९९३.

(२) शासन पत्र क्रमांक रॉकेल-२०१८/प्र.क्र. १/ना.पु. २७, दिनांक १४ मे २०१८.

(३) क्रमांक निशि/केरो/२०२१/२९/आठ/जा. १०, दिनांक ३ फेब्रुवारी २०२२.

(४) राज्यस्तरीय समन्वयक, तेल उद्योग यांचा दिनांक १ मार्च २०२२ रोजी प्राप्त ई-मेल संदेश.

**अधिसूचना**

क्रमांक निशि/केरो/२०२२/५४/आठ/जा. २३.—शासनाने वाचा क्र. २ च्या पत्रान्वये नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई यांनी राज्यस्तरीय समन्वयक, तेल उद्योग यांच्याकडून सुधारित डेपो दर प्राप्त करून घेऊन त्याआधारे केरोसीनचे दर सुधारित करण्याची कार्यवाही करावी, असे आदेशित केले आहे ;

ज्याअर्थी, सुधारित एक्स-डेपो दराचा तक्ता सोबत पाठवून सार्वजनिक वितरण व्यवस्थेमधील एक्स–डेपो दरामध्ये दिनांक १ मार्च २०२२ पासून सुधारणा केलेली असल्याचे राज्यस्तरीय समन्वयक, तेल उद्योग, मुंबई यांनी या कार्यालयास वाचा क्र. ४ च्या ई-मेल संदेशाद्वारे कळविले आहे ;

त्याअनुषंगाने सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वितरित करण्यात येणाऱ्या केरोसीनचा सुधारित कमिशनसह घाऊक व किरकोळ विक्री दर निश्चित करून त्याबाबत आदेश निर्गमित करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, वाचा क्र. १ मध्ये नमूद तरतुदीस अनुसरून मुंबई (मुंबई शहर व मुंबई उपनगर) केरोसीनच्या घरगुती वापराचे घाऊक व किरकोळ विक्रीचे दर दिनांक १ मार्च २०२२ पासून पुढील आदेश होईपर्यंत तात्काळ अंमलात आणणेकरिता पुढीलप्रमाणे अधिसूचित करीत आहे :—

| अ. क्र. | बाब | सध्याचा दर (रुपये प्रति कि. ली.) | सुधारित दर (रुपये प्रति कि. ली.) |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| ए | एक्स-डेपो दर (रुपये प्रति कि. ली.) | ४९१९२.०० | ५५८१५.०० |
| बी | वस्तू व सेवा कर (जीएसटी) @५% | २४५९.६० | २७९०.७५ |
| सी | घाऊक विक्रेत्यासाठी एकूण खरेदी किंमत [ए+बी] | ५१६५१.६० | ५८६०५.७५ |
| डी | (*i*) घाऊक विक्रेत्याचे कमिशन | १३४१.८८ | १३४१.८८ |
| | (*ii*) तापमान बदलामुळे येणाऱ्या घटीच्या व हाताळणूक तुटीच्या प्रतिपूर्तीसाठी असाधारण भत्ता. | ९९.०० | ९९.०० |
| | (*iii*) (A) वाहतूक खर्च | २८०.७९ | २८०.७९ |
| | (B) डिझेल व्यतिरिक्त अनुषंगिक बाबींचा खर्च | ७०.२० | ७०.२० |
| | (C) डिझेलवरील खर्चात झालेली वाढ | ९९.३४ | ९९.३४ |
| | एकूण वाहतूक खर्च (A+B+C) | ४५०.३३ | ४५०.३३ |
| | (*iv*) पथकर (Toll Tax) | ७०.०० | ७०.०० |
| | (*v*) घाऊक वितरकांना पुर्णांकाचा लाभ | ०.३६ | ५.९३ |
| | (*vi*) एकूण किंमत वाढ : [डी (*i*) + डी (*ii*) + डी (*iii*) + डी (*iv*) + डी (*v*)] | १९६१.५७ | १९६७.१४ |
| इ | एकूण किंमत वाढीवर, वस्तू व सेवा कर (जीएसटी) @५% [डी (*vi*) च्या ५%]. | ९८.०८ | ९८.३६ |
| एफ | एकूण [सी+डी (*vi*) + इ] घाऊक विक्रीचा दर | ५३७११.२५ | ६०६७१.२५ |
| एफ-१ | किरकोळ विक्रेत्यासाठी खरेदी किंमत | ५३७११.२५** (किंमत रुपये ५११५३.५७ + वस्तू व सेवा कर रुपये २५५७.६८) | ६०६७१.२५** (किंमत रुपये ५७७८२.१४ + वस्तू व सेवा कर रुपये २८८९.११) |
| जी | किरकोळ विक्रेत्याचे कमिशन (तुटीच्या लाभांसह) | ६७५.०० | ६७५.०० |
| एच | किरकोळ विक्रेत्याचे कमिशन (तुटीच्या लाभांसह) वर टक्के वस्तू व सेवा कर (जीएसटी) (जी च्या ५ टक्के) | ३३.७५ | ३३.७५ |
| आय | किरकोळ विक्री दर (रुपये प्रति किलो लीटर) | ५४४२०.००** (किंमत रुपये ५२८२८.५७ वस्तू व सेवा कर रुपये २५९१.४३) | ६१३८०.००** (किंमत रुपये ५८४५७.१४ वस्तू व सेवा कर रुपये २९२२.८६) |
| जे | किरकोळ विक्री दर (रुपये प्रति लीटर) | ५४.४२ | ६१.३८ |

शासन परिपत्रक क्रमांक अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, क्रमांक केईआर. १३७६/३७६९/१७, दिनांक १७ डिसेंबर १९७६ नुसार पुर्णांकाचा लाभ एकाच पातळीवर (घाऊक वितरक) घाऊक दरामध्ये समाविष्ट करण्यात आला आहे.

**कान्हूराज बगाटे** (भा.प्र.से.),
नियंत्रक, शिधावाटप व संचालक,
नागरी पुरवठा, मुंबई.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.